## वारकऱ्यांच्या वेशात सायबर वॉरियर्स - शारदा प्रांगणात प्रभावी सायबर दिंडी

## क्विक हील फाउंडेशनच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी सादर केला सायबर सजगतेचा अभिनव उपक्रम

यांतून नागरिकांशी सजग संवाद साधण्यात आला. विद्यार्थी प्रतिनिधी शिवानी चेडे, सागर मेरावी, विनया लाखे आणि महेश कांडेकर यांनी या दिंडीचे नेतृत्व केले. प्राचार्य डॉ. भरत शिंदे, विभागप्रमुख महेश पवार व समन्वयक अक्षय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला. प्राचार्य डॉ. शिंदे म्हणाले, सायबर सजगता ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक माध्यमातून दिंडीतील महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्वसामान्य वारकऱ्यांपर्यंत हा संदेश प्रभावीपणे पोहोचवला आहे. या उपक्रमातून सामाजिक भान, सर्जनशीलता व जनजागृती यांचे उत्कृष्ट उदाहरण साकारले गेले.